# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 28/07/2023 (शुक्रवार) दुपार**

---

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत मनसर माईन येथे दिनांक २६/०७/२०२३ चे १७:३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुधीर संचिलाल यादव, वय २७ वर्ष, रा. न्यु माईन तहसिल जयसिंगपुर, जि. सुल्तानपुर उ. प्र. ह. मु. क्वा. नं. ४२८, मनसर माईन वाहीटोला, ता. रामटेक हा मनसर माईन येथे कॉन्ट्रेक्टर असून माईन येथे ड्रिलींग करीता २०० रॉड आणले होते त्यापैकी ०९ ड्रिलींग रॉड प्रत्येकी किंमती ५,१५०/— रू. प्रमाणे एकुण ४६,३५०/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल इंगोले, पो. स्टे. रामटेक हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. वेलतूर** :— दिनांक २६/०७/२०२३ चे १८.०० वा. ते १८.३० वा. सुमारास पो.स्टे. वेलतूर हद्दीत फिर्यादीची पीडीत मुलगी वय १७ वर्ष ११ महीने हिला यातील आरोपी नामे— प्रणय कंटीराम कुलरकर वय २२ वर्ष रा मांढळ ता. कुही जि. नागपुर याने फिर्यादीचे रखवालीतुन लग्नाचे आमीष दाखवुन मोटरसायकलवर बसवुन पळवुन घेऊन गेला यातील फिर्यादीने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीस जीवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३६६ (अ), ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक करंगामी मो. नं. ९७६६३७६४८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर